पुढारी

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ४० व्या स्मृतिदिनानिमित्त विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठ प्रांगणातील अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांचा अर्धपुतळा व डॉ. आप्पासाहेब पवार कमवा आणि शिका विद्यार्थी वसतिगृह येथील अर्धपुतळा यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह प्रा. किसनराव कुराडे, डॉ. टी. के. सरगर, प्राचार्य डॉ. जी. पी. माळी, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. सी. टी. पवार, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. एन. एल. तरवाळ आदी उपस्थित होते.

पुढारी

# विवेकानंद कॉलेजमध्ये उद्योजकता विकास कक्षाचे उद्‌घाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या कॉमर्स विभागाच्या वतीने उद्योजकता विकास कक्षाचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठ कौशल्य आणि उद्योजकता विकास कक्षाचे संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. उद्योजिका पल्लवी कोरगावकर यांनी उद्योजकतेकडे प्रवास करताना विद्यार्थ्यांनी कोणत्या बाबींचे भान ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांनी सॉफ्ट स्कील्स व लाईफ स्कील्सचा विकास करून प्रगतीचा आलेख उंचावून स्वप्नपूर्ती करावी, याविषयी सुसंवाद साधला. प्रास्ताविक कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. एस. एस. काळे यांनी केले. सूत्रसंचालन ओजस्वी घोरपडे यांनी केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. यावेळी प्रा. पी. सी. पारिशवाड, डॉ. रेवती पाटील, प्रा. यू. डी. दबडे, प्रा. वाय. बी. माने, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. व्ही. बी. पुजारी उपस्थित होते.

पुढारी

# 'शिवराज'मध्ये सोमवारी व्याख्यान, पुरस्कार वितरण

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयात सोमवार, दि. ३ जानेवारी २०२२ रोजी दुपारी ४ वाजता व्याख्यान व विविध पुरस्कारांचे वितरण अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांचे 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारकार्याची प्रस्तुतता' या विषयावर जाहीर व्याख्यान होणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गडहिंग्लज तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांचा प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार तसेच कर्मवीर गुणवंत शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी पुरस्काराचे वितरण होणार आहे. संस्थाध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे अध्यक्षस्थानी असतील. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी केले.

पुण्यनगरी

# नव्याने उघडली ज्ञानाची कवाडे

कोल्हापूर : वैभव गोंधळी

**कोरोनामुळे अनेक नोकरी व्यवसायांवर गदा आली, तर नव्याने अनेक संधी उपलब्ध झाल्या. या नव्या संधीमुळे अनेक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला, तर ज्ञानाची अनेक कवाडे नव्याने उघडली गेली, तर पुन्हा एकादा कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.**



कोरोनाचा मोठा फटका नोकरी, व्यवसायांना बसला. त्यामुळे भविष्यात नोकरी व व्यवसायांच्या नव्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या अभ्यासक्रमांना विद्यार्थी व पालकांची मोठी पसंती आहे. नोकरी व्यवसाय उपलब्ध करून देणाऱ्या पारंपरिक अभ्यासक्रमांनाच केवळ प्रवेश विद्यार्थी घेत आहेत. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग प्रशिक्षण संस्था आदी ठिकाणी अनेक नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू होत आहेत. ऑनलाईन




पद्धतीने शिक्षण, तसेच परीक्षा घेता येते, याची जाणवी कोरोना काळात झाली. त्यामुळे अलीकडील काळात ऑनलाईन पद्धतीने अनेक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. ऑनलाईन माध्यमांच्या हाताळणीबाबत विविध अभ्यासक्रमांची सुरूवात शिवाजी विद्यापीठामध्ये होत आहे.

कोरोना साथीमुळे लागू करण्यात आलेल्या निर्बंधाची पहिली झळ शाळांना बसली. तब्बल दीड वर्षाहून अधिक काळ बंद असलेल्या शाळा सुरू झाल्या आहेत. शाळांमध्ये विविध शैक्षणिक, तसेच मैदानी स्पर्धांनाही सुरूवात या नवीन वर्षामध्ये होत आहे. त्यामुळे विद्यार्थी वर्गामध्ये चैतन्याचे वातावरण पसरले आहे. विविध शालेय स्पर्धा परीक्षांचे आयोजनही जानेवारीमध्ये करण्यात आलेले आहे.

शिवाजी विद्याठातर्फे जगभरातील विविध नामांकित संस्थांशी सामंजस्य करार या वर्षभरामध्ये करण्यात येणार आहेत. या करारामुळे येथील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांना परदेशात जाऊन शिक्षण घेता येणार आहे. परदेशातील नामांकित प्राध्यापक ऑनलाईन, तसेच ऑफलाईन पद्धतीने येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा लाभ शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांनाही होणार आहे.

वर्षभरात संशोधानासाठी प्राध्यान्य देण्याचा प्रयत्नही विद्यापीठातर्फे करण्यात येणार आहे.

01 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.फिल., पीएच.डी. प्रबंधांना मुदतवाढ

कोल्हापूर, ता. ३१ : एम. फिल. आणि पीएच.डी.चे प्रबंध सादर करण्याची तारीख ३१ डिसेंबर होती. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रबंध सादर करण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. पत्रकातील माहितीनुसार, विद्यापीठ अनुदान आयोगाने १६ मार्च २०२१ ला प्रसिद्ध केलेल्या आदेशामध्ये विद्यापीठातून एम. फिल. आणि पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले प्रबंध ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत सादर करण्याचे निश्चित केले होते. मात्र, कोरोनामुळे प्रबंध सादर करण्यात ३० जून २०२२ पर्यंतची मुदतवाढ दिली. विद्यार्थ्यांनी पुढील कार्यवाही करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.